# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ८ डिसेंबर २०१५

## भारत शैक्षणिक महासत्तेच्या वाटेवर- लॉरेन्स समर

मुंबई- येत्या २०३० मध्ये भारत शैक्षणिक महासत्ता बनणार असून भारताकडे मुबलक प्रमाणात शैक्षणिक सामर्थ्य असल्याचे प्रतिपादन  हॉर्वड विद्यापीठाचे ज्येष्ठ प्राध्यापक आणि अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा यांच्या राष्ट्रीय अर्थ परिषदेचे माजी संचालक लॉरेन्स समर यांनी केले. मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट संकुलातील पदवीदान सभागृहात आज "रिइन्व्हेंटिंग द युनिव्हर्सिटी - रिकन्सिलिंग इक्विटी अँड एक्सवलन्स इन हायर एज्युकेशन्या विषयावर प्रा. लॉरेन्स समर्स यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. ऑब्झर्व्हर रिसर्च फाउंडेशन आणि मुंबई विद्यापीठाने संयुक्तपणे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.लॉरेन्स समर म्हणाले की,भारतात मोठ्या प्रमाणात शैक्षणिक सामर्थ्य असून शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवून आणण्यासाठी भारताला ग्रॉस एनरॉलमेंट रेसो वाढविण्यावर विशेष भर द्यावा लागेल,त्याचबरोबर शिक्षणातल्या गळतीच्या संख्येवर विशेष लक्ष देऊन शिक्षण संस्थाना सर्वसमावेशकतेबद्दल खातरजमा करावी लागेल.भारतात उच्च शिक्षण देणा-या संस्थाना आदर्श निर्माण करुन शिक्षणक्षेत्रात आमुलाग्र बदल घडवून आणावे लागतील जेणेकरुन कोणत्याही शिक्षण संस्थेला या संस्थाकडे आदर्श म्हणून पाहता येईल तसेच तंत्रज्ञानाचा पुरेपुर वापर करुन मोबाईल प्लॅटफॉर्मवर शिक्षणक्रम उपलब्ध करुन द्यावे लागेल,भारताने हे करणे सहज शक्य असून हा शैक्षणिक उत्क्रांतीचा रोडमॅप असून याची अंमलबजावणी केल्यास भारत नजीकच्या काळात शैक्षणिक महासत्ता म्हणून नावारुपाला येणार असल्याचा आशावाद त्यांनी व्यक्त केला.त्याचबरोबर हा रोडमॅप साध्य करण्यासाठी भारतातील विद्यापीठाने दुरशिक्षणाच्या माध्यमातून अधिकाअधिक लोकापर्यंत पोहचण्याची योजना आखावी लागेल तसेच बेसिक सायन्ससाठी विशेष निधीची तरतूद करुन भारतातील शिक्षणाला निर्यात मुल्य मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.पुढे ते म्हणाले की शैक्षणिक संस्था या आदर्श समाजाच्या निर्मितीमध्ये मोलाची भूमिका पार पडत असून राष्ट्रउभारणीसाठी मदत करत असतात.सर्वोत्तम शिक्षण संस्थेची वैशिष्ट्ये विशद करतांना ते म्हणाले की,शैक्षणिक वातावरण  निर्मितीवर भर,स्वायतत्तेला प्राधान्य,शिक्षण संस्थामधील तीव्र स्पर्धा,स्थानिक घटकांना प्राधान्य किंवा स्थानिक घटकांचा अधिका अधिक अभ्यास आणि आर्थिक व्यवहारात लवचिकता निर्माण केल्यास शिक्षण संस्था या आदर्शवत ठरतात आणि त्यांचे अनुकरण इतरही करतात असे त्यांनी उपस्थितांना सांगितले.तसेच तंत्रज्ञानाच्या शक्तीसह टिकून समाजाला उत्तरोत्तर प्रगत करणे हे उच्च शिक्षणापुढचे आव्हान आहे, असे मत प्रा. लॉरेन्स समर्स यांनी मांडले.

अमेरिकेचे पहिले अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांचे उच्च शिक्षणासंबंधीच्या विचारांचे दाखले समर्स यांनी आपल्या भाषणात दिले. अमेरिकेत ज्यांचे आर्थिक उत्पन्न 60 हजार डॉलर्सपेक्षा कमी आहे, त्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदत केली जाते, असे सांगत उच्च शिक्षणासाठी आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांना

अशी मदत मिळायला हवी असे ते म्हणाले. उत्तम विद्यापीठे तेच चालवू शकतात ज्यांच्याकडे कल्पकतेचा अधिकार आहे, ते नाहीत ज्यांच्याकडे अधिकार गाजवण्याची कल्पकता आहे, असेही त्यांनी नमुद केले. नजीकच्या काळात भारतात १० हजाराहून अधिक अमेरिकन विद्यार्थी दाखल होणार असल्याचा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ऑब्झर्वर रिसर्च फाउंडेशनचे अध्यक्ष सुधींद्र कुलकर्णी यांनी केले.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव  (जनसंपर्क)